Gram : "Dnyanteerth"
**Swami Ramanand Teerth**
**Marathwada University**
*"Dnyanteerth", Vishnupuri,*
**Nanded - 431 606 (M.S.)**

तारः " ज्ञानतीर्थ "
**स्वामी रामानंद तीर्थ**
**मराठवाडा विद्यापीठ**
*"ज्ञानतीर्थ", विष्णुपूरी,*
नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

उत्तरपुस्तिका मुल्यांकनासाठी प्राध्यापकांनी उपस्थित राहणे बाबत...

## परीपत्रक

या परीपत्रकान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांना कळविण्यात येते की, मा.राज्यापालांकडून परीक्षा संपल्यानंतर ४५ दिवसाच्या आत निकाला घोषित करण्याबाबत वारंवार विद्यापीठास पत्रव्यवहार व निर्देश केले जात आहेत. त्यामुळे उत्तरपस्तिका मुल्यांकनाचे काम वेळेवर होणे अनिवार्य आहे.

तथापी विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, प्राध्यापकांना वेळोवेळी पत्रव्यवहार करुनही अनेक प्राध्यापक केंद्रीय मुल्यांकन केंद्रावर रुजू होत नाहीत. मुल्यांकनाचे काम टाळत असतात. परीणामी निकाल घोषित करण्यास विलंब होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. तसेच याबाबत मा.राज्यपलांकडूनही नाराज व्यक्त होत आहे.

दिनांक २१ जून २०१० रोजी संपन्न झालेल्या मा.परीक्षा मंडळाच्या बैठकीत यावर चर्चा होवून असा निर्णय घेण्यात आला की, जे प्राध्यापक या विद्यापीठाने पत्र देवूनही मुल्यांकनासाठी मुल्यांकन केंद्रावर रुजू होणार नाहीत अशा प्राध्यापकांना रुपये १०००/– दंड आकारावा व त्याची नोंद त्यांच्या सेवा पुस्तिकेत घेण्यात यावी तसेच विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३२ (६)(ग) नुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

तसेच कांही प्राध्यापक मुल्यांकन केंद्रात रुजू होतात परंतु ते विद्यापीठ नियमानुसार त्या त्या दिवसाचा किमान उत्तर पत्रिका तपासण्याचा कोटा पुर्ण करीत नाहीत अशा प्राध्यापकांवरही नियमानुसार कार्यवाही केली जाणार आहे.

शिवाय सर्व प्राचार्यांनाही विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या महाविद्यालयातील ज्या प्राध्यापकांना मुल्यांकनासाठी बोलावण्यात आले आहे त्यांना त्वरीत मुल्यांकन केंद्रात रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करावे, अन्यथा अशा प्राचार्यांवरही नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

कृपया पुढे पहा

तेंव्हा सर्व प्राचार्यांना पुनश्च विनंती करण्यात येते की, त्यांनी वरील सर्व बाबीचा गांर्भीयाने विचार करुन सदरील बाब आपल्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांच्या निदर्शनास आणून द्यावी व विद्यापीठास सहकार्य करावे.

पनिका/प.म.कार्यवाही/२००९—२०१०/ १५५७
ऑगस्ट २५, २०१०
२४

परीक्षा नियंत्रक

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.